CNR - MHKO130003312023

**सीमा उर्फ जयश्री बळवंत उर्फ बळीराम आरेकर विरुध्द बळवंत उर्फ बळीराम सखाराम आरेकर**

## महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा अर्ज क्र.१०/२०२३ मधील अर्ज निशाणी क्र. ५ वर आदेश पारीत

१. सदरचा अर्ज अर्जदार हिने महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे तिला अंतरीम पोटगी व घरभाडे मिळण्याकरीता वि.प.क्र. १ यांच्याविरुध्द दाखल केला आहे.

**अर्जाचा सारांशः-**

२. अर्जदार यांच्या कथनानुसार, अर्जदार व वि.प.क्र. १ यांचा विवाह दिनांक २२/०३/२००९ इ. रोजी अर्जदार यांच्या घरी आणूर, ता. कागल येथे झाला असून सदरचा विवाहाचा संपूर्ण खर्च अर्जदार यांचे वडीलांनी केलेला असून लग्नात अर्जदार यांचे वडीलांनीच लग्नात संसारासाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य अर्जदारास दिले आहे.

३. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, लग्नानंतर अर्जदार या वि.प. यांच्या घरी नांदणेकरीता गेल्या. त्यावेळी जेमतेम दोन ते अडीच महिने अर्जदार यांना वि.प. यांचेकडून व्यवस्थित वागणूक मिळाली. मात्र त्यानंतर वि.प.क्र. २ व ३ हे अर्जदार यांच्याकडे घरातील वि.प.क्र. २ व ३ यांनी त्यांच्या नातेवाईकांच्या व वि.प.क्र. १ हे नोकरीवर असतानाही मानपानावरुन तक्रारी केल्या. त्यावेळी अर्जदारांच्या वडीलांनी अर्जदारांच्या भवितव्याचा विचार करून वि.प.क्र. २ व ३ यांच्या मागणीस होकार दिला.

४. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, वि.प.क्र. १ हे नोकरीच्या निमित्ताने सावंतवाडी आगारात चालक म्हणून रूजू होते. त्यामुळे ते दोन ते तीन दिवसांनी घरी सुरूपली येथे येत असत. दरम्यान वि.प. यांच्या गैरहजेरीत वि.प.क्र. २ व ३ यांनी अर्जदार यांना घरचा सर्व स्वयंपाक तसेच इतर कामे नित्यनियमाने केले. परंतु कोणत्या ना कोणत्या कारणांवरुन वि.प.क्र. १ ते ६ यांनी अर्जदार यांना मानसिक त्रास देवून त्यांचेवर वारंवार दबाव ठेवणेचा प्रयत्न केला.

५. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, अर्जदार या वि.प.क्र. १ पासून गरोदर राहिल्या. त्यावेळी त्यांना रक्तदाबाचा त्रास चालू झाला. त्यामुळे विश्रांतीची गरज असलेने

वि.प.क्र. २ व ३ यांनी अर्जदार यांना त्यांच्या माहेरी सोडणेबाबत वि.प.क्र. १ यांना सांगितले. मात्र रक्तदाबाचा त्रास चालू झालेचे माहित असतानाही त्यांची काळजी घेण्याऐवजी व योग्य त्या डॉक्टरांकडे उपचार सुरू करण्याऐवजी आर्थिक खर्च नको म्हणून वि.प. यांनी अर्जदारांना जबरदस्तीने माहेरी पाठविले. अर्जदार या माहेरी आलेनंतर त्यांनी डॉ.साईनाथ पाटील, निपाणी, ता.निपाणी (कर्नाटक) यांचेकडे गरोदरपणातील उपचार चालू केले. साधारणतः मे व जून महिन्याच्या कालावधीत त्यांना प्रसुतीच्या वेदना चालू झालेने त्या पाटील नर्सिंग होम, निपाणी येथे दाखल झाल्या. सदरची बाब वि.प.क्र. १ यांनी अर्जदाराच्या वडीलांना कळविली असता, वि.प.क्र. १ यांनी कामाचे कारण काढून येण्यास स्पष्ट नकार दिला. दरम्यान, अर्जदारांच्या गरोदरपणाच्या संपूर्ण कालावधीत म्हणजेच माहे डिसेंबर–२००९ ते माहे जून–२०१० मध्ये वि.प. हे कधीही अर्जदार यांना भेटण्याकरीता आले नाहीत. दरम्यान, गरोदरपणामध्ये अर्जदार यांना रक्तदाबाचा त्रास चालू झाला. त्या कारणाने अर्जदारांच्या जिवीतास धोका असलेने बाळ किंवा आई यापैकी कोणीतरी एकच जिवंत राहील असे डॉक्टरांनी सांगितले. तसेच ऑपरेशनवेळी बाळास पिशवीसह काढावे लागणार असलेचे सांगितले व त्यावेळी नवऱ्याची परवानगी आवश्यक असल्याचे सांगितले. त्यावेळी वि.प.क्र. १ यांच्या संमत्तीची गरज असताना व तसे त्यांना कळवून देखील त्यांनी येणेस नकार दिला. शेवटी अर्जदारांच्या आई वडीलांच्या संमत्तीने अर्जदारांचे ऑपरेशन केले. यादरम्यान त्यांचे अपत्य दगावले. त्यानंतर जवळपास आठवड्याने संबंधित दवाखान्यातून डिस्चार्ज मिळालेनंतर अर्जदार या माहेरी आल्या.

६. तेंव्हापासून आजतागायत गेली १३ वर्षे अर्जदार यांनी वारंवार विनंती करूनही वि.प.क्र. १ यांनी अर्जदार यांना नांदावयास नेले नाही. सदर अर्जदारांच्या आजारपणाचा एकूण खर्च रक्कम रू. ४०,०००/– इतका आला आहे. सदर खर्चाकरीता थोडी फार मदत करण्याबाबत यातील अर्जदारांचे वडीलांनी वि.प.क्र. १ यांना विनंती केली होती. त्यावेळी वि.प.क्र. १ यांनी तुमची मुलगी आहे, तुम्हीच पैसे भरा असे कळविले व अर्जदारांना बघण्यास देखील आले नाहीत. त्याचप्रमाणे अर्जदार यांच्या बाळंतपणावेळी रक्कम रू. ४०,०००/– इतका खर्च देखील देण्यास नकार दिला.

७. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, अर्जदार या माहेरी असताना वि.प. हे माहे जुलै–२०१० मध्ये अर्जदारांना भेटण्याकरीता आले. त्यावेळी झालेल्या प्रकाराबाबत वि.प.क्र. १ यांनी त्यांची बाजू सांगण्याचा प्रयत्न केला व त्यांनी वि.प.क्र. २ व ३ यांचे कारण सांगून भेटण्यास न आलेचे सांगितले. तेंव्हापासून वि.प.क्र. १ हे अर्जदार यांचेकडे

आणूर, ता. कागल येथे भेटण्याकरीता येत असून तेथेच वस्ती राहून दुसऱ्या दिवशी जेवणाचा डबा घेवून जातात. वि.प.क्र. १ हे अगदी अलिकडे दिनांक २४/१२/२०२२ इ. रोजी अर्जदार यांना भेटून वस्ती करून गेले. वि.प.क्र. १ यांचेकडे अर्जदार यांचे दोन क्रमांकावरुन फोनवर संपर्क होता. एकेदिवशी अर्जदार यांनी वि.प.क्र. १ यांना एका क्रमांकावर संपर्क केला असता, सदर नंबरवर अनोळखी स्त्री बोलू लागली व तिने बळीराम आरेकर यांची पत्नी असलेचे सांगितले. त्यावेळी अर्जदार यांनी सदर स्त्रीला पुरावे विचारले असता, त्यांनी अर्जदाराच्या मोबाईलवरून संबंधित वि.प.क्र. १ यांच्या सोबतच्या तथाकथित लग्नाचा फोटो पाठवून स्वतःचे नाव साक्षी रोहित भोसले असे असलेचे सांगितले व त्यांचे लग्न दिनांक २७/०४/२०२२ इ. रोजी आप्पाचीवाडी येथील विठ्ठल दळवी यांच्या घरी झालेचे सांगितले. सदरची बाब अर्जदार यांना समजलेनंतर त्यांनी मुरगूड पोलीस स्टेशन येथे दिनांक १६/०१/२०२३ इ. रोजी वि.प.क्र. १ यांचेविरूध्द तक्रार दिली असता, सदरची तक्रार गु.र.नं. १०/२०२३ अन्वये एन.सी.आर. म्हणून नोंद आहे. सदर लग्नास वि.प.क्र.२ ते ६ यांनी मदत केली असून, तेही सदर गुन्हयात सामील आहेत.

८. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, सदरची बाब समजलेनंतर अर्जदार यांनी वि.प. यांच्या दुस–या नंबरवर फोन करून विचारले असता, प्रथमदर्शनी त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिली व लग्न केले नसलेचे खोटे उत्तर दिले. मात्र चौकशी दरम्यान सदरची घटना सत्य असल्याचे समजले व अश्या प्रकारे अर्जदार यांना वि.प.क्र. २ यांनी मानसिक व शारिरीक स्वरूपाचा छळ दिला.

९. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, वि.प.क्र. १ यांच्या नोकरी व्यतिरिक्त ते ऊस वाहतुकीचा व्यवसाय करीत असून, त्यांचेकडे ट्रक व ट्रॅक्टर अशी वाहने आहेत. घरी शेती असून, सदर शेती जोडधंदा म्हणून आर्थिक दुभती जनावरे देखील आहेत. त्यामुळे वि.प. हे अतिशय सधन व आर्थिकदृष्टया संपन्न आयुष्य जगत आहेत. वि.प. यांचे राहणीमान देखील उच्चवर्गीय असून, सदरचे राहणीमान व सदरचे आयुष्य पत्नी व अर्धांगिनी म्हणून प्रस्तुत अर्जदारांना प्राप्त होणे नैतिकदृष्टया व कायदेशीरदृष्टया हक्क आहे. सदर हक्कांपासून अर्जदारांना वि.प. यांनी प्रथमपासून वंचित ठेवले आहे. तसेच वि.प.क्र. १ याने अर्जदारविरूध्द मे.दि.न्या.व.स्तर, कोल्हापूर येथे हिंदू विवाह कायदा कलम १३ प्रमाणे घटस्फोटाकरीता एच.एम.पी.नं. ३८६/२०१७ चा अर्ज दाखल केला आहे. सदर अर्जाकामी अर्जदार यांना नोटीस प्राप्त झालेनंतर त्यांनी वि.प.कडे विचारणा केली असता, वि.प.क्र. १ यांनी ''वंशाला दिवा पाहिजे, त्याकरीता दुसरे लग्न करायला पाहिजे आणि

तुला घटस्फोट दिल्याशिवाय दुसरे लग्न होणार नाही व माझा वंश पुढे चालणार नाही'' असे सांगून अर्जदार यांना कोर्टात हजर न राहणेचे सांगितले. तथापि, अर्जदार यांनी त्याकामी वकील व सोबत अर्जास म्हणणे दिले व सदरचा अर्ज अद्यापही प्रलंबित आहे.

१०. अर्जदार यांच्या पुढील कथनानुसार, सध्या अर्जदार हे सन २०१० पासून आपल्या माहेरी राहणेस असून, प्रस्तुत अर्जदारांचा संपूर्ण खर्च म्हणजेच त्यांचा कपडेलत्ता, उदरनिर्वाह, औषधपाणी व तद्अनुषंगिक येणारा संपूर्ण खर्च त्यांचे वडील हेच करीत असतात. वि.प.क्र. १ हे अर्जदार यांना भेटण्याच्या निमित्ताने आणूर येथे येत असतात. या दरम्यान अर्जदार यांनी वि.प.क्र. १ यांना त्यांच्या ट्रकच्या व्यवसायाकरीता रक्कम रू.४७,०००/– इतकी बचत गटातून रक्कम दिलेली आहे. ती रक्कम अर्जदार यांना वि.प.क्र. १ ने अद्यापी दिलेली नाही, त्यामुळे अर्जदारांची अडचण निर्माण झाली आहे. त्यामुळे सदरची रक्कम तसेच वर नमूद केलेप्रमाणे पोटगी व घरभाडे मिळणेकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल करणेस कारण घडले आहे.

११. सदरचा मुळ अर्ज चालून अंतिम निकाल होणेस बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्याने दरम्यानचे कालावधीमध्ये अर्जदार यांचे उदरनिर्वाहाकरीता, औषधपाण्याकरीता, निवासाकरीता आर्थिक रक्कमेची आवश्यकता आहे. अर्जदार यांना स्वतःचा खर्च व राहणीमानाकरीता दरमहा रक्कम रू.१५,०००/— प्रस्तुत अर्जाचे तारखेपासून अदा करणेबाबत वि.प.क्र. १ यांचेकडून व्हावा अशी विनंती केली. तसेच अर्जदार यांना राहणेची सोय म्हणून वि.प. यांचे मालकीची घरामध्ये राहणेची सोय करावी अथवा त्याबाबत अडचण निर्माण झालेस पर्याय म्हणून अर्जदार यांना अन्य ठिकाणी रहिवासाकरीता घरभाडे व अन्य सोयीकरीता म्हणून दरमहा रू. ५,०००/– इतकी रक्कम वि.प. यांनी अर्जदार यांना देणेबाबत आदेश व्हावा अशी विनंती केली आहे.

## **वि.प.चे उत्तराचा सारांशः–**

१२. वि.प. यांनी मुख्य अर्जास व अंतरिम पोटगीचे अर्जास निशाणी क्र. १५ वर म्हणणे दाखल केले आहे. वि.प यांनी विवाह मान्य केला, मात्र इतर बाबी संपूर्णपणे नाकारल्या. वि.प. यांच्या कथनानुसार, अर्जदार ही लग्नानंतर काही दिवसच वि.प.क्र.१ यांचेकडे नांदली. तदनंतर अर्जदार या घरातील कोणतीही काम न करणे, गप्प गप्प बसणे, वि.प. यांचे घरातील कोणाशीही न बोलणे, एकटे रहाणे असे प्रकार करू लागली. त्यामुळे वि.प.क्र.१ यांनी अर्जदार यांचे आई वडीलांना अर्जदार हिचे एकलकोंडे स्वभावाबाबत

सांगितले असता, अर्जदार यांचे आई वडीलांनी अर्जदार हिचे स्वभावाबाबत कोणतीही माहिती दिली नाही. यातील वि.प. यांनी अर्जदार हिस वेळोवेळी सदरबाबत चौकशी केली असता, अर्जदार हिने वि.प.क्र.१ यांना आपली तब्बेत वरचेवर बरी नसते व अर्जदार हिस फिटस् येत असलेबाबत सांगितले व त्यास अर्जदार यांचे आई वडीलांनीही कबुली दिली. याबाबत वि.प. यांना पुर्व कल्पना अर्जदार यांनी न दिल्याने वि.प. यांची फसवणूक केली आहे. असे असतानाही वि.प.क्र.१ अर्जदार हिचेशी प्रामाणिकपणे संसार करणेचा प्रयत्न करीत होते व अर्जदार यांचेवर चांगल्या दवाखान्यामध्ये उपचार करणेचे प्रयत्न केले आहेत. परंतू, अर्जदार यांना खूपच त्रास होवू लागला असता, अर्जदार या नेहमी आपले माहेरी जाणे व माहेरी राहणे पसंत करू लागल्या.

१३. वि.प. यांच्या पुढील कथनानुसार, अर्जदार या वि.प.क्र.१ व घरचे लोकांचेसोबत कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय भांडण तंटा करून आपले माहेरी जाणे पसंत करत होत्या. यातील वि.प. व वि.प. यांचे घरचे लोक अर्जदार हिचे इच्छेखातर व अर्जदार हिस बरे वाटावे याच उद्देशाने अर्जदार हिस तिचे मर्जीप्रमाणे राहत होते. परंतु अर्जदार हिचे स्वभावामध्ये कोणत्याही प्रकारचा फरक पडलेला नव्हता. वि.प. यांनी अर्जदार यांना काही गोष्टी समजावून सांगणेचा प्रयत्न केला असता, अर्जदार यांनी वि.प. यांचेकडे अपत्य होणेबाबत भांडणतंटा करणे सुरू केले. वि.प.क्र.१ यांनी अर्जदार हिस तिचे तब्येतीची कल्पना देवून समजावून सांगणेचा प्रयत्न केला असता, अर्जदार यांनी वि.प.क्र.१ यांचेशी वेळोवेळी भांडणतंटा करून हट्ट करून कोणत्याही परिस्थितीमध्ये आपल्याला अपत्य पाहिजेच असा अट्टाहास सुरू केला. तसेच त्याबाबत डॉक्टरांचे सल्ला घेतला असता, डॉक्टरांनीही अर्जदार यांचे जीवितास धोका असुन अपत्याबाबत विचार न करणेचा सल्ला दिला होता. अर्जदार यांचे इच्छेखातर वि.प.क्र.१ यांनी डॉक्टरांचे सल्याकडे दुर्लक्ष करून निव्वळ अर्जदार हिचे सुखासाठी अपत्य होणेकरीता संधी घेतली. अर्जदार हया तीन महिन्याच्या गरोदर असताना अर्जदार या आपले माहेरी निघून गेल्या. अर्जदार यांचेवर वि.प. यांनी पाटील नर्सिंग होम, डॉ. साईनाथ पाटील या सुप्रसिध्द डॉक्टरांचेकडे उपचार सुरू केले होते. अर्जदार जरी माहेरी गेल्या असल्या, तरी वि.प.क्र.१ अर्जदार यांचे माहेरी येवून राहत होते. वि.प.क्र.१ अर्जदार हिचे सेवेसाठी राहत असताना अर्जदार हिस दवाखान्यामध्ये घेवून जाणे, औषधोपचार करणे, तिचे तब्बेतीची काळजी घेणे वगैरे सर्व प्रामाणिकपणे करत होते. दुदैवाने अचानकपणे दिनांक १४/०७/२०१० इ. रोजी अर्जदार हिची प्रसुती झाली. सदरवेळी अर्जदार किंवा बाळ एकच जगु राहील असे डॉक्टरांनी

सांगितले असता, अर्जदार यांचे आई वडीलांनी वि.प. यांना सदर घटनेबाबत न कळविता प्रसुती करुन घेतली त्यात त्यांच्या अपत्याचा मृत्यु झाला. सदर घटनेबाबत अर्जदार यांनी कोठेही वाच्यता करणेचा प्रयत्न केलेला नाही. सदरच्या बाबी अर्जदार अगर अर्जदार यांचे आई वडीलांनी वि.प. यांना सांगितलेल्या नाहीत. सदर वेळी दवाखान्याचा सर्व खर्च वि.प.क्र. १ यांनी केलेला आहे. दवाखान्यामध्ये अर्जदार हिस डिस्चार्ज घेतलेले व उपचार केलेले सर्व कागदपत्रे वि.प.क्र. १ यांचेकडेच आहेत. या कारणास्तव अर्जदार यांचा सदरचा अर्ज चालणेस पात्र नाही.

१४. वि.प.यांच्या पुढील कथनानुसार, घटनेनंतर वि.प.क्र. १ यांनी अर्जदार हिस नांदावयास आणले, परंतु अर्जदार यांना वि.प.क्र. १ यांचेकडे करमत नाही असे बहाणे सांगून अर्जदार वि.प. यांचेकडे राहणेस तयार नव्हती. वि.प.क्र. १ व घरचे लोकांनी अर्जदार हिस समजावून सांगून अर्जदार हिस नांदवणेचा प्रयत्न केला, परंतु अर्जदार या आठ ते दहा दिवस सासरी, तर एक ते दोन महिने माहेरी अशा राहू लागल्या. अर्जदार यांची मनस्थिती ठीक नसलेले समजून घेवून वि.प.क्र. १ यांनीही अर्जदारसोबत कधी आणूर तर कधी सुरुपली येथे राहणे पसंत केले. त्यानंतर अर्जदार या कधी माहेरी तर कधी सासरी असे करत करत कायमपणे आपले माहेरी राहू लागल्या. वि.प.क्र. १ यांनी अर्जदार हिस समजावून सांगून नांदणेस आणणेबाबत प्रयत्न केले, परंतू अर्जदार या नांदावयास येणेस तयार नव्हत्या. अर्जदार या अपत्यप्राप्ती करू शकत नसलेने अर्जदार यांनीच वि.प.क्र. १ यांना दुसरे लग्न करणेचा सल्ला दिला. परंतू वि.प.क्र. १ यांनी दुसरे लग्न करणेस नकार दिला असता, अर्जदार यांनी वि.प.क्र. १ यांचे सोबत पुन्हा कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय भांडणतंटा करणे सुरू केले.

१५. दरम्यान अर्जदार यांनी सुरूपली गावी येवून थोडे दिवस राहणे येणे जाणे सुरू केले व पुन्हा अर्जदार यांनी वि.प.क्र. १ यांना दुसरे लग्न करणेबाबत तगादा लावला व अर्जदार हिचे इच्छेखातर वि.प.क्र. १ यांनी दुसरे लग्न केलेले आहे. वि.प. यांनी अर्जदार यांना वेळोवेळी नांदवणेचा प्रयत्न केलेला आहे. तथापि, अर्जदार यांनी वि.प. यांचेबरोबर नांदणेची इच्छा नसलेचे सांगून वि.प. यांचा कोणत्याही संयुक्तिक कारणाशिवाय त्याग केलेला आहे. अर्जदार या वि.प. यांचा त्याग करून आपले माहेरी राहत आहेत. अर्जदार यांनी स्वतः वि.प. यांचा त्याग केलेला आहे. त्यामुळे अर्जदार यांना वि.प. यांचेकडे कायदयाने पोटगी मागता येणार नाही. वि.प. यांनी अर्जदार यांना केव्हाही मारहाण, शिवीगाळ अथवा छळ केला नाही. वि.प. यांचे नावे शेती अगर घर अगर कोणतेही उत्पन्नाचे

साधन नाही. वि.प. हे कसेबसे आपला व आपले आई वडीलांचा चरितार्थ करतात.

१६. याउलट, अर्जदार ही धडधाकट व सुशिक्षीत असून स्वतःचा चरितार्थ स्वतः करू शकते. अर्जदार ही कपडे शिवणे, बचत गट सांभाळते. त्यापासून अर्जदार ही महिन्याला रक्कम रुपये ५,०००/– मिळविते. वि.प. यांची परिस्थिती गरिबीची असून वि.प. यांचेवर वयस्क आई वडीलांची सर्व जबाबदारी आहे. वि.प. यांचे आई व वडील रक्तदाब व मधुमेह यांनी ग्रासले असुन वि.प. यास स्वतःचा चरितार्थ करणे फार त्रासाचे आहे. मात्र, निव्वळ वि.प. यांना त्रास देवून पैसे उकळणेच्या उद्देशाने अर्जदार यांचे विरूध्द सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. वि.प हे अर्जदार यांचेसोबत योग्य ती चर्चा करुन आज देखील अर्जदारास नांदविण्यास तयार असल्याने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

## उभयतांचा युक्तिवादः–

१७. अर्जदाराच्या विव्दान विधिज्ञांनी अर्जास अनुसरुन असा युक्तीवाद केला की, वि.प. हे महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळ येथे चालक या चांगल्या पदावर नोकरीस असून त्यास चांगले वेतन मिळते. वि.प.क्र. १ यांचे स्वतःचे मालकीचे राहते घर आहे असे कथन केले आहे. तसेच वि.प. यांचा ऊस वाहतुकीचा व्यवसाय असून त्यांचेकडे ट्रक व ट्रॅक्टर अशी वाहने आहेत. तसेच त्यांची शेती असून जोडधंदा म्हणून आर्थिक दुभती जनावरे देखील आहेत. अर्जदार ही तिच्या माहेरी कागल येथील आणूर गावी सन २०१० पासून राहत असून तिला उदरनिर्वाहाचे कोणतेही साधन नाही. शिवाय, अर्जदाराच्या कथनाला पुष्टी देण्याकरीता तिने तिचे प्रतिज्ञापत्र देखील दाखल केले असुन वि.प. याने त्यांना उदरनिर्वाहासाठी कोणतीही रक्कम दिल्याचे दर्शविले नाही. तसेच वि.प.ने त्यांच्यावर असलेल्या जबाबदारीचे व संपत्तीचे प्रतिज्ञापत्र दिले नाही, व अर्जदार ही नेहमी आजारी असते अशी कथने वि.प. यांनी केली असल्यामुळे या सर्व बाबींमुळे अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे अर्जदाराने मागणी केल्यानुसार पोटगी देण्यास वि.प. सक्षम असुन, विनंतीप्रमाणे अर्ज मंजुर करण्याचा युक्तीवाद केला.

१८. वि.प.च्या विव्दान विधीज्ञांनी अर्जास व म्हणण्यास अनुसरुन असा युक्तीवाद केला की, अर्जदार हया कपडे शिवणे, बचत गट सांभाळणे अशी कामे करत असून त्यातून त्यांना दरमहा रक्कम रुपये ५,०००/– इतका पगार मिळतो. तसेच अर्जदार या स्वतःहून कोणतेही संयुक्तिक कारण नसताना माहेरी आणूर येथे सन–२०१० पासून राहत आहेत. याउलट, वि.प. यांना मिळत असणा–या नोकरीच्या उत्पन्नातून त्यांच्या वृध्द आईवडीलांचा

सांभाळ करणे, औषधोउपचाराचा खर्च करणे या जबाबदा–या असून अर्जदारास वि.प.क्र. १ नांदविण्यास तयार असूनही अर्जदार नांदावयास येत नसल्याने अर्जदार ही अंतरिम पोटगी व घर भाडे मिळण्यास पात्र नसून अर्जदाराचा अर्ज नामंजूर करण्याचा युक्तीवाद केला.

## –कारणमिमांसा–

१९. दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकले. अर्ज व अर्जाच्या म्हणण्याचे अवलोकन केले. अर्जदार आणि वि.प.क्र. १ यांचा विवाह आज ही कायम असल्याचे अभिलेखावरुन दिसुन येते. वरील बाब लक्षात घेता, तसेच मुख्य अर्ज व त्यास निशाणी क्र.१५ नुसार वि.प.क्र. १ यांचा विस्तृत जबाब लक्षात घेता, प्रकरणात पुरावा होवून अर्ज निकाली निघण्यास काही अंशी कालावधी लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. वि.प.यांच्या कथनानुसार, अर्जदार ही माहेरी कागल येथील आणूर गावी सन २०१० पासून वेगळी राहत असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते.

२०. वि.प.क्र. १ यांच्या उत्तरानुसार ते अर्जदारास नांदविण्यास तयार आहेत एवढेच दिसुन येते. परंतु त्यांनी दुसरा विवाह केल्याचे उत्तरात नमूद असून अदखलपात्र गुन्हयाची नोंद व घटस्फोटाचे प्रकरण ही गुणवत्तेवर सुरु असल्याचे दिसुन येते. तसेच अर्जदार ही कमावण्यास सक्षम असल्याबाबत वि.प.क्र. १ यांचा बचाव आजघडीस असल्याचे दिसून येते. मात्र, तो बचाव आज घडीस पुराव्याअभावी जशाचा तसा ग्राहय धरणे संयुक्तीक नाही. त्यामुळे तिचे माहेरी कागल येथील आणूर गावी राहण्याचे कारण हे मुळ अर्जाच्या गुणवत्तेवर निकाली निघण्यास पात्र आहे. सद्यस्थितीत, वि.प.क्र. १ ने तिला काही आर्थिक मदत दिली असे दाखवण्याकरीता अभिलेखावर कोणतेही दस्त दाखल केले नाहीत.

२१. अंतरिम पोटगीची रक्कम ठरविताना न्यायालयाने ती अशा प्रकारे ठरविणे आवश्यक आहे की, अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र व्यक्तीना भटके व हालअपेष्टेचे तसेच भोग विलासी जीवन जगण्यास मज्जाव करेल. अर्जदाराच्या प्रतिज्ञापत्रावरुन प्रथमदर्शनी तिची निर्वाहाबाबत वि.प. यांनी व्यवस्था केल्याचे दिसून येत नाही. शिवाय, वि.प.ने अर्जदारास उदरनिर्वाहाकरीता नियमित काही रक्कम दिली असल्याचे आजघडीस दर्शवले नाही. आई वडीलांप्रमाणे पत्नीचा व अपत्याचा सांभाळ करणे हे वि.प. यांचे प्राथमिक नैतिक कर्तव्य आहे. शिवाय वि.प. यांनी अर्जदार नेहमी आजारी राहते अशी कथने केली आहेत.

२२. वि.प. यांनी त्यांच्या जबाबामध्ये स्वतःच्या उत्पन्नाबाबत ते राज्य परिवहन

महामंडळात नोकरी करत असल्याचे दिसून येते. तसेच जबाबदारी व संपत्तीची माहिती देण्यास कोणतेही प्रयत्न केल्याचे दिसून येत नाही. अर्जदार यांनी वि.प.च्या नोकरीबाबत सकारात्मक पुरावा दिला व वि.प. यांनी ते नौकरी करत नसल्याचे नाकारले नाही. तसेच निशाणी क्र. १८ वर आगार व्यवस्थापक, राज्य परिवहन, आजरा यांच्याकडून वि.प.क्र. १ यांचे चालक या पदावरील माहे एप्रिल–२०२२ ते माहे मार्च–२०२३ या महिन्याअखेरचे पगाराचे दाखले दाखल केलेले आहेत. सदर पगार दाखल्याचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, वि.प.क्र. १ यांना माहे मार्च–२०२३ चे वेतन रुपये २९,९१७/– देय असल्याचे दिसून येते.

२३. अशा परिस्थितीत अर्जदार यांचा राहणीमानाचा व सामाजिक दर्जा, वि.प.च्या कामाचे स्वरुप, वि.प.ने त्यांच्या उत्पनाबाबत केलेली कथने, महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा या कलमाचे उद्दिष्ट, अर्जदाराचे वि.प. यांनी प्रथम दर्शनी मान्य केलेले आजारपण या संपुर्ण बाबी विचारात घेता, अर्जदार हिला रक्कम रुपये ६,०००/– अशी तात्पुरती अन्न, वस्त्राची रक्कम दरमहा वि.प.क्र. १ यांनी सदरचा अर्ज दाखल तारखेपासून अर्जदारास दयावी असे आदेशित करणे उचित होईल. तसेच अर्जदारास आजघडीस रहिवाशीची नितांत गरज असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येत असल्याने त्याकरीता तिला घरभाडे म्हणून दरमहा रक्कम रुपये २,०००/– इतकी देण्याची तरतुद वि.प.क्र. १ यांनी करावी अथवा तिच्या रहिवासाची स्वतंत्र व्यवस्था करावी असे आदेशित करणे योग्य ठरेल. त्यास्तव खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो–

**–: आदेश :–**

१. अंतरिम पोटगीची विनंती अशंतः मंजुर करण्यात येते.

२. वि.प.क्र. १ यांनी अंतरीम अर्ज दाखल तारखेपासून अर्जदार हिला दरमहा रक्कम रुपये ६,०००/– इतकी अंतरिम पोटगी व अर्जदारास दरमहा रक्कम रुपये २,०००/– घरभाडे पुढील आदेशापर्यंत दर महिन्याच्या पाच तारखेपुर्वी नियमित दयावी.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

BHASKAR DEVIDAS GORE
Digitally signed by BHASKAR DEVIDAS GORE
Date: 2023.08.22 16:00:13 +0530

कागल
(बी.डी.गोरे)

दिनांकः– २१/०८/२०२३
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
कोर्ट क्र. १, कागल.